# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
## बृहन्मुंबई खंडपीठ

सूचना का अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल केलेले अपील**

**अपील क्र. MHSICMU/२०२२/M/००३११०**

**अपिलार्थी श्री. नितीन मुकुंद आडकर**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी**

उपनिबंधक, सहकारी संस्था, म्हाडा
(मुंबई शहर, पूर्व उपनगरे व कोकण मंडळ कार्यक्षेत्र)
कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ/ म्हाडा, मुंबई यांचे कार्यालय,
गृहनिर्माण भवन, पोटमाळा, रुम नं.१७६, वांद्रे (पूर्व) मुंबई -४०० ०५१.

**प्रथम अपिलीय अधिकारी**

उपनिबंधक, सहकारी संस्था, म्हाडा
(मुंबई शहर, पूर्व उपनगरे व कोकण मंडळ कार्यक्षेत्र)
कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ/ म्हाडा, मुंबई यांचे कार्यालय,
गृहनिर्माण भवन, पोटमाळा, रुम नं.१७६, वांद्रे (पूर्व) मुंबई -४०० ०५१.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २४.०४.२०२३**

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| २४.०५.२०२२ | - | ०७.०७.२०२२ | - |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. २९.०८.२०२२ रोजीच्या अर्जांन्वये जन माहिती अधिकारी यांचेकडून आदेश प्राप्त झाले नाहीत असे नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांचा अर्ज दि. २४.०५.२०२२ अन्वये खालील माहिती विचारलेली आहे:-

" गृहनिर्माण सहकारी संस्थेबाबत केलेला तक्रार अर्ज निकाली काढताना कोण्तो निकष लावले जातात. (उदा- किती नोटीसी आणि सुनावणी नंतर कारवाई केली जाते) आणि अर्ज निकाली काढण्यास किती दिवसाची कालमर्यादा असते म्हणजे अर्ज दाखल केल्यापासून ते अर्ज निकाली काढेपर्यंत संपूर्ण प्रक्रीयेची तपशीलवार माहिती द्यावी."

सुनावणीचे वेळी जन माहिती अधिकारी यांनी सादर केले की, माहिती अर्जाचे अनुषंगाने दिनांक १४.०६.२०२२ रोजी अपिलार्थी यांना माहिती पाठविण्यात आली आहे.

..२/-

अपिलार्थी यांनी सादर केले की, दिनांक १४.०६.२०२२ चे पत्र त्यांना प्राप्त झालेले नाही. हे पत्र कसे पाठविले याबाबत जन माहिती अधिकारी यांनी माहिती द्यावी.

यावर माहिती अधिकारी यांनी फक्त असे सादर केले की, दि. १४.०६.२०२२ चे पत्र पोस्टामार्फत पाठवले आहे. तथापि, त्याबाबतचे कोणतेही पुरावे आयोगासमोर सादर करण्यात आले नाहीत.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

## आदेश

**१. जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १४.०६.२०२२ चे पत्राची प्रत नोंदीकृत टपालामार्फत अपिलार्थी यांना ०७ दिवसात निशुल्क उपलब्ध करुन द्यावी.**

**२. दिनांक १४.०६.२०२२ चे पत्र अपिलार्थींना कसे पाठविले होते त्याबाबतचे पुरावे व या संबंधीचा खुलासा १५ दिवसात आयोगासमोर सादर करावा.**

State Information Commission Greater Mumbai

सुनील पोरवाल
**(सुनील पोरवाल)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

मुंबई
दिनांक : २५.०४.२०२३

निर्गमित
APR 2023

## अपील क्र. MHSICMU/२०२२/M/००३११०

**अपिलार्थी श्री. नितीन मुकुंद आडकर**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी**
उपनिबंधक, सहकारी संस्था, म्हाडा (मुंबई शहर, पूर्व उपनगरे व कोकण मंडळ कार्यक्षेत्र)
कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ/ म्हाडा, मुंबई यांचे कार्यालय,
गृहनिर्माण भवन, पोटमाळा, रुम नं. १७६, वांद्रे (पूर्व) मुंबई -४०० ०५१.

**प्रथम अपिलीय अधिकारी**
उपनिबंधक, सहकारी संस्था, म्हाडा (मुंबई शहर, पूर्व उपनगरे व कोकण मंडळ कार्यक्षेत्र)
कोकण गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ/ म्हाडा, मुंबई यांचे कार्यालय,
गृहनिर्माण भवन, पोटमाळा, रुम नं. १७६, वांद्रे (पूर्व) मुंबई -४०० ०५१.

**(In continuation of order dtd २५.०४.२०२३)**

उक्त प्रकरणी आयोगाने दि. २५.०४.२०२३ रोजी पुढीलप्रमाणे आदेश दिले होते:-

१. *"जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १४.०६.२०२२ चे पत्राची प्रत नोंदीकृत टपालामार्फत अपिलार्थी यांना ०७ दिवसात निशुल्क उपलब्ध करुन द्यावी.*
२. *दिनांक १४.०७.२०२२ चे पत्र अपिलार्थींना कसे पाठविले होते त्याबाबतचे पुरावे व या संबंधीचा खुलासा १५ दिवसात आयोगासमोर सादर करावा."*

२. सदर प्रकरणी आयोगाचे आदेश दि. २५.०४.२०२३ रोजीच्या अनुषंगाने श्री. प्रमोद कुलकर्णी, जन माहिती अधिकारी तथा सहकार अधिकारी श्रेणी- २, उपनिबंधक सहकारी संस्था, म्हाडा, वांद्रे (पूर्व), मुंबई यांनी दि. १२.०९.२०२५ रोजी खालीलप्रमाणे खुलासा आयोगास सादर केलेला आहे:-

*"आयोगाच्या आदेशानुसार मी दि. १४.०६.२०२२ रोजीचे पत्र पुन्हा अपिलार्थी यांना दिलेले आहे व त्यावर अपिलार्थींनी दि. २६.०४.२०२३ रोजी प्राप्त झाले असे नमुद करुन स्वाक्षरी केलेली आहे."*

३. श्री. प्रमोद कुलकर्णी, जन माहिती अधिकारी तथा सहकार अधिकारी श्रेणी- २, उपनिबंधक सहकारी संस्था, म्हाडा, वांद्रे (पूर्व), मुंबई यांनी सादर केलेल्या खुलाशाचे अवलोकन केल्यावर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांचा खुलासा मान्य करण्यात येत आहे. सबब आदेश पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

**जन माहिती अधिकारी यांचा खुलासा मान्य करुन करण्यात येत आहे. सदर अपील अंतिमत: निकाली काढण्यात येत आहे.**

State Information Commission Greater Mumbai

**मुंबई**
**दिनांक : २९.०५.२०२६**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**